स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

### शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि. रायगड-४१० २०६.

ई-मेल पत्ता :- jtdire.१११५@gmail.com दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४६१४२०)

जा.क्र.: विससं/उशि/कोविप/मवि/२०२२/ 1724 दि.१४.०७.२०२२

प्रति,

१. कुलसचिव,
   १. अमेटी विद्यापीठ, पनवेल, जि.रायगड
   २. छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ, पनवेल, जि.रायगड
   ३. विजयभूमी विद्यापीठ, पनवेल, जि.रायगड

२. प्राचार्य / संस्था प्रमुख,
   सर्व अधिनस्त कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक व शारिरीक शिक्षण शास्त्र महाविद्यालये,
   जिल्हा: ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

**विषय: "स्वातंत्र्याचा अमृत महात्सव" अंतर्गत "हर घर तिरंगा" हा उपक्रम राबविण्याबाबत...**

संदर्भ: १. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण ८२२२/प्र.क्र.११० (भाग-२)/सां.का.४, दि.३०.०६.२०२२
२. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण ८२२२/प्र.क्र.११० (भाग-२)/सां.का.४, दि.२०.०६.२०२२
३. मा.जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी, ठाणे यांची दि.११.०७.२०२२ रोजीची बैठक
४. प्रस्तूत कार्यालयाचे पत्र क्र.विसूसं/उशि/कोविप/मवि/२०२२/१७०४, दि.१२.०७.२०२२

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भ क्र.१ व २ अन्वये कळविण्यात येत आहे की, संदर्भ क्र.३ च्या नूसार मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत दि. ०९ ऑगस्ट, २०२२ ते दि.१७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीमध्ये "हर घर तिरंगा" हा उपक्रम राबवून यशस्वी करण्याबाबत सूचित केले आहे. त्या अनुषंगाने प्रस्तूत कार्यालयामार्फत दि.१४.०७.२०२२ रोजी घेण्यात आलेल्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार "स्वातंत्र्याचा अमृत महात्सव" अंतर्गत "हर घर तिरंगा" हा उपक्रम महाविद्यालयाच्या स्तरावर राबविण्याबाबतची रुपरेषा सोबत सहपत्रीत केलेली आहे.

त्यानुसार प्रत्येक महाविद्यालयाने आपल्या स्तरावर कार्यक्रमांचे नियोजन करावे. सदर नियोजनाचा आढावा दि.२५.०७.२०२२ रोजीच्या जिल्हानिहाय बैठकीत घेतला जाईल. सदर बैठकीची लिंक एक दिवस आधी सूचित करण्यात येईल.

(डॉ.संजय जगताप)
विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

## "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत "हर घर तिरंगा" हा उपक्रम राबविण्याबाबत

**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण ८२२२/प्र.क्र. ११०(भाग-२)/सां.का.४, दि. २० जून, २०२२.**

**परिशिष्ट - अ**

**ई) कृती आराखडा : शाळा आणि महाविद्यालये**

- शिक्षक आणि प्राचार्य यांच्यामार्फत जाणीव-जागृती करणे. सदर योजनेचा प्रचार, प्रसार करण्यासाठी या माध्यमाचा वापर करावा.
- राष्ट्रध्वजाला समर्पित विशेष संमेलने/शिबीरे/चर्चासत्र इ. चे आयोजन करावे.
- #hargharjhanda / (#harghartiranga) या हॅशटॅगखाली समाज माध्यमांवर छायाचित्रे प्रसारीत करावीत. राज्य/जिल्हा/महाविद्यालयाचा उल्लेख करुन सोशल मिडीयावर फोटो शेअर करावेत.
- पालकांचा सहभाग :- सर्व पालकांना सहभागी होण्यासाठी विशेष दैनंदिन सूचना पत्रे, पत्रके वितरीत करावीत.
- पालक शिक्षक सभा :- हर घर तिरंगा विषयी माहिती देण्यासाठी पालक शिक्षक सभांचे आयोजन करावे.

**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२२/प्र.क्र. १६१/सां.का.४, दि. ३० जून, २०२२.**

**"स्वराज्य महोत्सव" अंतर्गत राज्य स्तरावरील कार्यक्रमांचे नियोजन**

**परिशिष्ट - अ**

| अ. क्र. | कार्यक्रमाचे नाव | कार्यक्रमाची थोडक्यात रुपरेषा |
|---|---|---|
| १ | समुह राष्ट्रगान | महाराष्ट्रातील सर्व शाळा/विद्यापीठ व महाविद्यालय/शैक्षणिक संस्था यामधून **दिनांक ९ ऑगस्ट रोजी सकाळी ११.०० वाजता** एकाच वेळी राष्ट्रगीत गायन होईल. सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यामध्ये सामील होतील. तसेच राज्यातील नागरिकांनाही या वेळी ज्या ठिकाणी असतील त्या ठिकाणी उभे राहून राष्ट्रगीत गायनास्तव आवाहन करावे. यामुळे या उपक्रमाद्वारे एक विश्वविक्रम करता येईल. |

**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२२/प्र.क्र. १६१/सां.का.४, दि. ३० जून, २०२२.**

**"स्वराज्य महोत्सव" अंतर्गत जिल्हा स्तरावरील कार्यक्रमांचे नियोजन**

**परिशिष्ट - ब**

**(मा. जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली सदर उपक्रम राबविण्यात यावा.)**

| अ. क्र. | कार्यक्रमाचे नाव | कार्यक्रमाची थोडक्यात रुपरेषा |
|---|---|---|
| ८. | एन सी सी /एन एस एस सायक्लोथॉन/ मॅरेथान | स्वातंत्र्यदिनी एन.सी.सी./ एन.एस.एस. कॅडेट चे संचलन करण्यात यावे. तसेच सायक्लोथॉन, मॅरेथानचे जिल्ह्याच्या मुख्यालयी आयोजन करण्यात यावे. |
| ९. | विविध स्पर्धा निबंध/ वक्तृत्व/ चित्रकला | शालेय/महाविद्यालय स्तरावरुन विविध स्पर्धा, निबंध, वक्तृत्व, चित्रकला स्पर्धाचे आयोजन करण्यात यावे. |
| १३. | विद्यापीठ स्तरावर कार्यक्रम | ९ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत स्वराज्य महोत्सवानिमित्त जिल्ह्यातील विद्यापीठात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे. (कार्यशाळा/चर्चासत्रे/विविध स्पर्धा/जाणीव जागृती इ.) |
| १५. | सांस्कृतिक कार्यक्रम | ९ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत स्वराज्य महोत्सवानिमित्त जिल्ह्यात विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे. |
| १६. | आजादी का अमृत महोत्सव आकाम (AKAM) लोगो शासकीय इमारतीवर लावणे | ९ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत स्वराज्य महोत्सवानिमित्त जिल्ह्यातील शासकीय इमारतीवर आजादी का अमृत महोत्सवी लोगो लावावा. (Cutout /Selfi Point) |
| १७. | पुरातत्व दृष्ट्या महत्वाची स्थळे स्वच्छता | जिल्ह्यातील पुरातत्वदृष्ट्या महत्वाच्या वारसा स्थळाची स्वच्छता करण्यात यावी. |
| १८. | कार्यालयाची स्वच्छता | ९ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत स्वराज्य महोत्सवानिमित्त कार्यालयांची स्वच्छता करण्यात यावी. |

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२२/प्र.क्र. १६१/सां.का.४,
दि. ३० जून, २०२२.

"स्वराज्य महोत्सव" अंतर्गत तालुका स्तरावरील कार्यक्रमांचे नियोजन

परिशिष्ट - क

(तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली सदर उपक्रम राबविण्यात यावा. )

| अ. क्र. | कार्यक्रमाचे नाव | कार्यक्रमाची थोडक्यात रुपरेषा |
|---|---|---|
| २. | वृक्षारोपण/वृक्ष लागवड | तालुकास्तरावर शासकीय कार्यालयात वृक्षारोपन करण्यात यावे. |
| ५. | विविध स्पर्धा | शालेय/महाविद्यालय स्तरावरुन विविध स्पर्धा, निबंध, वक्तृत्व, चित्रकला स्पर्धाचे आयोजन करण्यात यावे. |
| ६. | सांस्कृतिक कार्यक्रम | ९ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत स्वराज्य महोत्सवानिमित्त जिल्ह्यात विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे. |
| ८. | स्वच्छता मोहिम | ९ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत स्वराज्य महोत्सवानिमित्त कार्यालयांची स्वच्छता करण्यात यावी. |

**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२२/प्र.क्र. १६१/सां.का.४, दि. ३० जून, २०२२.**

**"स्वराज्य महोत्सव" अंतर्गत वार्ड/ग्राम स्तरावरील कार्यक्रमांचे नियोजन**

**परिशिष्ट - ड**

**(तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली सदर उपक्रम राबविण्यात यावा.)**

| अ. क्र. | दिनांक | कार्यक्रमाचे नाव | कार्यक्रमाची थोडक्यात रुपरेषा |
|---|---|---|---|
| ४. | १० ऑगस्ट, २०२२ | स्वच्छता मोहिम | शालेय विद्यार्थी, युवक मंडळे, महिला मंडळे तसेच ग्रामपंचायत /वार्ड स्तरावरील अधिकारी कर्मचारी आणि शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या सहभागातून स्वच्छता मोहिम राबवावी. गावातील महत्वाची सार्वजनिक ठिकाणे वारसास्थळे व महत्वाच्या वास्तू या ठिकाणाची स्वच्छता करुन सुशोभीकरण करावे. |
| ७. | ११ ऑगस्ट, २०२२ | गावाचा इतिहास राष्ट्राचा इतिहास | प्रत्येक गावाला स्वतःचा एक इतिहास असतो, त्या इतिहासाची माहिती तरुण पिढीला असणे आवश्यक आहे. यामध्ये सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, सामाजिक, नैसर्गिक साधन संपत्ती याबाबतची नोंद करणे अपेक्षित आहे. सदर माहिती नोंद करण्याची प्रक्रिया विद्यार्थी स्तरावरुन करण्यात येईल. |
| १४. | १४ ऑगस्ट, २०२२ | वृक्षारोपण | ऑगस्ट महिन्यामध्ये पावसाळा मध्यावर आलेला असतो, त्यामुळे या कालावधीत वृक्षारोपण कार्यक्रम ग्रामपंचायतीनी हाती घ्यावा. वृक्षारोपणासाठी इंडेमिक वनस्पतींचा जास्तीत जास्त वापर करण्यात यावा. सामाजिक वनीकरण विभागाने वनस्पतीची रोपे पुरवण्याची जबाबदारी स्विकारावी. प्रत्येक ग्रामपंचायतीने कमीत कमी ७५० वृक्षांची लागवड करावी. वृक्ष लागवडी नंतर संवर्धनासाठी ही झाडे गावातील युवक मंडळे, विद्यार्थी, महिला बचत गट यांना दत्तक देण्यात यावीत. |
| १५. | १५ ऑगस्ट, २०२२ | प्रभात फेरी | गावातील शालेय मुलाच्या व महाविदयालयीन मुलांच्या माध्यमातून प्रभात फेरीचे आयोजन करण्यात यावे. सकाळी ७.०० वाजता सदरील प्रभातफेरी सुरु होईल. गावातील प्रमुख रस्त्यावरुन ही प्रभातफेरी मार्गक्रमण करेल. यावेळेस विद्यार्थ्यांच्या हातात गावातील क्रांतीकारकाची नावे असणारे फलक, अनसंग हिरो यांची नावे/ फोटो असणारे फलक देण्यात येतील. |
| १६. | १५ ऑगस्ट, २०२२ | शालेय स्पर्धा | गावातील युवक-युवती शालेय विद्यार्थी महिला यांच्यासाठी वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन करण्यात यावे. यामध्ये प्रश्नमंजूषा, पारंपारीक खेळ यासारख्या स्पर्धांचा विचार करण्यात यावा. |
| १८. | १६ ऑगस्ट, २०२२ | सांस्कृतिक कार्यक्रम प्रबोधन / देशभक्तीपर कार्यक्रम / स्वराज्य फेरी | गावातील लोककलाकार कीर्तनकार तसेच प्रबोधनकार यांना देशभक्तीपर विचारांचा कार्यक्रम सादर करण्यास प्रेरीत करावे. यामधून सर्व ग्रामस्थांना लोककलेविषयी, कलाकाराविषयी माहिती होईल. तसेच देशभक्तीपर विचार-प्रबोधनाचा/स्फुर्तीदायक गीतगायनाचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात यावा. |
| १९. | १७ ऑगस्ट, २०२२ | स्वराज्य महोत्सव सांगता समारोह स्वराज्य फेरी, देशभक्तीपर चित्रपट दाखविणे | स्वराज्य महोत्सव सांगता समारोह करताना प्रभात फेरीचे आयोजन करावे. देशभक्तीपर स्फुर्तीदायक गीत गायनाचा सांस्कृतिक कार्यक्रम, शाळेत/महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे तसेच देशभक्तिपर स्फुर्तीदायक चित्रपट दाखविणे. |